दिनांक – ४/९/२०१३

# * सभेचा वृत्तांत *

* आज बुधवार दिनांक ४ सप्टेंबर २०१३ रोजी सायंकाळी ५=०० वा० प्राध्यापक हॉलमध्ये स्थानिक व्यवस्थापन समितीची (वरीष्ठ महाविद्यालय) सभा मा० अध्यक्ष साहेबा मा० श्रीमती निलीमाताई वसंतराव पवार यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयातील खालील विषयावर चर्चा करण्यासाठी आयोजीत करण्यात आलेली होती.

* सभेचे विषय :→

१) इमारत बांधकाम (पहिला मजला) करणे
२) स्टाफरूम खिडक्या, पहिल्या मजल्यावरील दोन वर्ग व ऑडीटोरीयम यांना स्लाईडींग विंडो बसविणे
३) स्टाफ क्वार्टर दरवाजे दुरूस्ती करणे
४) इमारत स्लॅप गळती दुरूस्ती करणे
५) वर्ग खोल्यांना रंगकाम चुना देणे
६) वाणिज्य प्रयोगशाळा, फर्निचर, खुर्च्या, स्टुल खरेदी
७) बाथरूम दरवाजे रिपेअर्स व स्टाफरूम मधील किचनला ग्लेझ टाईल्स बसविणे
८) लेडीजरूम व जेन्ट्स टॉयलेट नुतनीकरण
९) ११ वी व्होकेशनल कोर्सला आय.टी (I.T) विषय सुरू करणेबाबत
१०) ऑक्सिजन पार्क
११) विद्यार्थी ड्रेसकोड
१२) अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी आलेले विषय

* स्थानिक व्यवस्थापन समिती (~~वरीष्ठ~~ वरीष्ठ महाविद्यालय)
(२०१२ - २०१७)
सभेला उपस्थित असलेले सदस्य

| अ.क्र. | नाव | हुद्दा | सही |
| --- | --- | --- | --- |
| १) | मा. श्रीमती निलीमाताई वसंतराव पवार | अध्यक्षा | |
| २) | मा. श्री गायकवाड जयवंतराव जयराम | सदस्य | |
| ३) | मा. श्री चौधरी विठ्ठलराव त्र्यंबक | सदस्य | |
| ४) | मा. श्री कदम रत्नाकर विनायकराव | सदस्य | |
| ५) | मा. श्री बोरस्ते चंद्रभान बाबुराव | सदस्य | |
| ६) | मा. श्री. गायखे भास्करराव बबनराव | सदस्य | |
| ७) | मा. श्री कदम अरुण भाऊराव | सदस्य | |
| ८) | मा. श्री शेडोवड विष्णु कचरु | सदस्य | |
| ९) | मा. श्री. वाबळे रामनाथ कचरु | सदस्य | |
| १०) | मा. डॉ. ए. पी. पाटील | सचिव | Patil |
| ११) | प्रा. ठाकरे रमाकांत हंसराज | प्राध्यापक प्रतिनिधी | |
| x१२) | प्रा. पगार ललितकुमार दगाजीराव | प्राध्यापक प्रतिनिधी | |
| १३) | प्रा. भदाणे प्रदिपकुमार रघुनाथ | प्राध्यापक प्रतिनिधी | Bhadane |
| x१४) | श्री. कोनडे दिनेश भिवा | शिक्षकेतर प्रतिनिधी | |
| १५) | सौ. वाघ सुनेहा तानाजी | निमंत्रित सदस्य | |
| १६) | प्रा. डॉ. पटेल एस. आय | निमंत्रित सदस्य | |

सभेचा वृतांत

सभेस सुरूवात झाल्यानंतर मा.प्राचार्य डॉ. ए.पी. पाटील यांनी नूतन स्थानिक व्यवस्थापन समिती (सन.२०१२-१५) सदस्यांचे स्वागत व परिचय करून देण्यात आला.

स्थानिक व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा मा. श्रीमती निर्मलाताई पवार यांना महाविद्यालयातील विविध बाबींचा अहवाल सादर केला त्यामध्ये खालील विषयावर सविस्तर माहिती देण्यात आली.

१) महाविद्यालयाचे परिक्षा निकाल खालीलप्रमाणे आहेत

| | |
|---|---|
| T.Y.B.A | 70% |
| T.Y.B.Com | 79% |
| T.Y.B.Sc. | 83% |
| 12th Arts | 42% |
| 12th Com | 84% |
| 12th Sc. | 93% |
| M.C.V.C. | 93% |
| M.A | 69% |

२) विद्यार्थी संख्या → सिनिअर कॉलेज → 1106 } 2011
→ ज्युनिअर कॉलेज → 905 }

३) वृक्षारोपण – महाविद्यालयात वड, पिंपळ यांची १२५ झाडे लावण्यात आलेली आहेत तसेच इतरही अनेक झाडे लावण्यात आलेली आहे. आणि त्यातील बरेचसे झाडे जगलेली. २-३ वर्षात महाविद्यालयाचा परिसर त्यामुळे हिरवागार होईल.

४) ठिबक सिंचन → वृक्षारोपण केलेली झाडे जगविण्यासाठी महाविद्यालयाने एप्रिल व मे महिन्यात पाण्याच्या टंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन ठिबक सिंचन योजना अंमलात आणली आहे त्यामुळे उन्हाळ्यात झाडांना पाण्याचा पुरवठा होऊन वृक्षाचे चांगले संवर्धन झाले आहे

५) स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन → स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र महाविद्यालयाने विद्यार्थ्यासाठी विनामूल्य सुरू केलेले आहे. दर शनिवारी तेथे M.P.S.C व U.P.S.C. उत्तीर्ण झालेले व कोचिंग देणाऱ्या मान्यवरांना बोलावले जाते व विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या संदर्भात मार्गदर्शन केले जाते त्याचा १२५ विद्यार्थी लाभ घेत आहेत.

६) पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण → महाविद्यालयाच्या क्रिडा विभागा तर्फे पोलिस भरतीपूर्वी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते त्यामुळे विद्यार्थ्यांना त्याचा चांगल्या प्रकारे लाभ झालेला आहे विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार हा उपक्रम सुरु करण्यात आलेला आहे. यामुळे पोलिस दलात भरतीसाठी विद्यार्थी सदर योजनेचा लाभ घेतात

७) बार्शिस योजना → महाविद्यालयातील प्राध्यापकांनी १००००/- रुपये मुदत ठेवीच्या स्वरुपात महाविद्यालयाकडे जमा केले आहे. ते पैसे बँकेत ठेवून त्यांच्यावर येणाऱ्या व्याजाच्या रकमेचे पारितोषिक विविध वर्गात प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनींना समाजादिनाच्या दिवशी वितरीत केले जा

८) क्रिडा विभाग → महाविद्यालयाच्या जिमखान्याचे नेकच्या निमित्ताने बांधकाम पूर्ण होऊन तो शुटींग रेंज/ टेबल टेनीस व सिक्स स्टेशन इ० अद्यावत साधनांनी सुसज्ज करण्यात आलेला आहे. तसेच महाविद्यालयाचे विद्यार्थी विभागीय पातळी पर्यंत पोहचते आहेत याचे श्रेय सर्व क्रिडा संचालकांनी घेतलेल्या प्रयत्नांना दिले जाते.

९) एन. एस. एस → महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक २५० आहे. विविध ठिकाणी स्वयंसेवकांना शिबीरासाठी पाठविले जाते त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होत असतो - राज्याच्या SRD व राष्ट्रीय पातळीवरील NRD परेडसाठी विद्यार्थी सहभागी झाले असून त्यातील दोन विद्यार्थी अंतिम फेरी पर्यंत पोहचले आ

१२) एन. सी. सी → महाविद्यालयात ७ बटालियन - ५० कॅडेटसचे १ राष्ट्रीय छात्र सेनेचे पथक असून विविध शिबिरासाठी विद्यार्थी सहभागी होतात तसेच 'B' व 'C' सर्टीफिकेट परीक्षा उत्तीर्ण झालेले आहे पैकी ज्यांनी 'C' Certificate Exam. पास केलेली आहे त्यांना मिलीटरीत प्रवेश मिळतो असे कॅडेटस् महाविद्यालयात आ

१३) ग्रंथालय → महाविद्यालयाच्या ग्रंथालयात २०,०५९ ग्रंथ आज पर्यंत उपलब्ध करुन दिलेले आहे. त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, क्रमिक अभ्यासक्रमाची पुस्तके मासिके इ० चा समावेश आहे. स्पर्धा परीक्षेची पुस्तके खरेदी करुन विद्यार्थ्यांना त्यासाठी प्रोत्साहन दिले जाते.

१४) सेमिनार → प्राध्यापकांनी ६० शोध निबंध प्रसिद्ध झालेले आहेत - (आंतरराष्ट्रीय - १७, राष्ट्रीय - १६, राज्यपातळी २७ आणि - १४७ सेमिनार व परिषदेत सहभाग घेतलेला आहे

१५) पी.एच.डी → महाविद्यालयात – ६ पी.एचडी प्राप्त प्राध्यापक, ८ – एम.फील, ८ – सेट, २ नेट उत्तीर्ण झालेले असून 3 प्राध्यापक एम.फील व पी.एच.डीचे मार्गदर्शक आहेत. १६ प्राध्यापकांनी पी.एच.डी. साठी नोंद नोंदविलेली आहेत ५ प्राध्यापकांनी मेजर व मायनर प्रोजेक्ट पूर्ण केलेले आहेत ४ प्रोजेक्ट सुरु आहेत, ७ प्रोजेक्ट दाखल केलेले आहेत

१६) Placement cell → 3 विद्यार्थी पोलीस उपनिरीक्षक → ७ पोलीस व ४ संरक्षणदलात यांची निवड झालेली आहे.

१७) आज महाविद्यालयात – ६६ संगणक, ४ लॅपटॉप ४ स्कॅनर, १८ प्रिंटर, 3 एलसीडी, 1 इंटरॲक्टीव्ह प्रोजेक्टर आहेत

१८) निर्भयकन्या अभियान, विद्यार्थ्यांनी व्यक्तीमत्व मालिका उद्योजकता, जयकर व्याख्यानमाला, संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक व्याख्यान माला, कमवा व शिका, मूल्य व लैंगिक शिक्षण, ६० कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना समुपदेशन केले जाते.

१९) ११ व्या योजने अंतर्गत महाविद्यालयास १७,९५,०००/- रुपये अनुदान मिळाले असून काही रक्कम खास साधनसामुग्रीसाठी च मंजूर झालेली आहे त्यापैकी प्रयोगशाळेत लागणाऱ्या उपयुक्त साधनसामुग्री खरेदी करण्यात आलेली आहे.

वरिल सर्व माहिती सादर केल्यानंतर सभेच्या कार्यक्रमपत्रिकेनुसार विषयास सुरुवात झाली

१) मा० प्राचार्य डॉ. ए.पी.पाटील यांनी वर्गसंख्येची अपूर्णता याबाबत अडचणी व्यक्त केल्या. तसेच ग्रंथालयातील तीव्र अडचणीबाबत सविस्तर माहिती दिली. ग्रंथालय विस्तार करणे अतिशय गरजेचे असून त्याकडे त्वरीत लक्ष बांधकाम सुरु करण्यासाठी विनंती करण्यात आली. मा. अध्यक्षांनी सदर विषयास संमती देऊन त्याबाबतचा प्रस्ताव मध्यवर्ती कार्यालयास पाठविण्यास सांगितला.

२) स्वाक्रम खिडक्या, पहिल्या मजल्यावरील दोन वर्ग व ऑडीटोरीयम यांना स्लाईडींग विंडो बसविणे बाबत चर्चा करण्यात आली आणि त्याबाबतचा प्रस्ताव मध्यवर्ती

कार्यालयास पाठविण्यास सांगितले

३) स्टाफ क्वार्टरचे दरवाजे खराब झालेले असल्यामुळे त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक त्याबाबत चर्चा करण्यात आली आणि मध्यवर्ती कार्यालयाकडे संबंधित प्रस्ताव पाठविण्यात यावा त्यास सर्वांनी मान्यता दिली

४) इमारतीच्या वरच्या मजल्यावरील स्लॅपची गळती पाऊस पडल्यानंतर सुरू होते आणि इमारतीचे नुकसान होते त्यामुळे स्लॅपच्या गळती संदर्भात योग्य तो उपाय करण्यासाठी त्यामधील तज्ञ व बांधकाम सोनातील अनुभवी व्यक्तींना पाचारण करून कमीत कमी खर्चात व चांगले काम कसे होईल त्याबाबत चर्चा झाली आणि त्याबाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल वरील महत्वाच्या विषयाच्या संदर्भात सर्व सदस्यांनी त्यास मंजुरी देण्यात आली

५) वाणिज्य शाखेच्या प्रयोगशाळेसाठी फर्निचर, खुर्च्या व स्टुल खरेदी संदर्भात चर्चा झाली आणि वाणिज्य प्रयोगशाळा सुसज्य करण्यात यावी त्यासाठी फर्निचर, खुर्च्या खरेदी करण्यासाठी मंजुरी देण्यात आली.

६) सर्व मजल्याच्या खोल्यांना चुन्याचे रंग काम देणे गरजेचे आहे कारण आतील भाग अतिशय खराब झालेला आहे शिवाय वर्गास सुशोभित केल्यास सुंदर दिसण्यास मदत होईल त्याकरिता चुनाचा रंग देण्यास काहीच हरकत नाही सर्वांनी त्यास मान्यता दिली

७) बाथरूमची दारे व स्टाफरूम मधील कितनली ग्लेझ टाईल्स बसविण्याच्या संदर्भात चर्चा झाली बाथरूमची दारे दुरुस्त करणे आवश्यक आहे तसेच स्टाफरूम धील कितनली ग्लेझ टाईल्स बसविल्यास भिंतीला संरक्षण मिळेल आणि दिसायला देखील आकर्षक दिसेल म्हणून हे दोन्ही कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावी यावर सर्व सदस्यांनी त्यास होकार दिला आणि चांगले काम करण्यात यावे अशी सूचना करण्यात आली

८) लेडीजरुम व जेन्टस् टॉयलेट यांचे नुतनीकरण करणे अंत्यत आवश्यक आहे कारण त्यातील काही फुटलेले असत पाईप व टाईल्स इ.ची दुरुस्ती व नवीन फिटींग करणे आवश्यक असल्याने नुतनीकरण लवकरात लवकर करावे अशी सूचना करण्यात आली. कारण विद्यार्थी आणि विद्यार्थीनी यांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा चांगल्या असल्या पाहिजे असे प्राचार्यानी सांगितले. सर्वांनी या सुविधा देण्यासाठी लेडीजरुम व जेन्टस् टॉयलेट यांचे नुतनीकरण करण्यात यावे यास मंजूरी दिली.

९) ११वी व्होकेशनल विभागात आय.टी (I.T) विषय सुरु करावा या संदर्भात विद्यार्थ्यांची वाढती मागणी आल्यामुळे महाविद्यालयात सदरचा विषय शुल्क घेऊन सुरु करावा असे मेंड श्याम पगार व श्री रत्नाकर कदम यांनी सूचना मांडली व सर्वानुमते या विषयास मंजुरी देण्यात आली

१०) विद्यार्थी ड्रेस कोड बाबत मा. सरचिटणीस श्रीमती निलिमा-ताई पवार यांनी सविस्तर माहिती सांगितली त्यानुसार १२वी व TY च्या वर्गातील विद्यार्थ्यांना जुन्या ड्रेसकोडप्रमाणे वापरण्यास परवानगी तर इतरांना नवीन ड्रेस घेण्यास सांगितले

११) महाविद्यालयात विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आलेले आहे. त्यामुळे ऑक्सिजन निर्मिती होईल ही बाब लक्षात घेऊन भविष्यकाळात महाविद्यालयात सकाळी व संध्याकाळी जेष्ठ नागरिक व विद्यार्थी यांना महाविद्यालयाच्या मैदानावर फिरणे सुरु होईल आणि जॉगिंग ट्रॅकमुळे फिरणे सुखद होईल आणि मनोसोक्त ऑक्सिजन मिळेल. अशी अपेक्षा प्राचार्य डॉ. ए.पी. पाटील यांनी व्यक्त केली. कारण ओझर गावात कोठेही मोकळी जागा उपलब्ध नाही शिवाय वृक्ष सुद्धा दिसत नाही त्यामुळे हा अभिनव उपक्रम महाविद्यालयातर्फे राबविण्यात येत आहे. मागील २ वर्षात विविध वृक्ष मैदानात ~~[illegible]~~ वाढलेले आहेत. अजून दोन वर्षात मैदानात सर्वत्र हिरवेगार व प्रसन्न असे वातावरण निर्माण होईल त्याचा फायदा विद्यार्थ्यांबरोबर समाजास देखील होईल. सर्व सदस्यांनी हा कल्पनेचे

कौतुक केले. सर्वांनी या उपक्रमास शुभेच्छा दिल्या

१८) ~~सेनवकेच्या~~ अध्यक्षांच्या परवानगीने तेनवेळी आलेले विषया-
पैकी महाविद्यालयासाठी रस्ता चांगला होणे गरजेचे त्यासाठी
सर्व सदस्यांनी आपल्या ~~[illegible]~~ ओळखीने प्रयत्न करावा
जेणे करून रस्ता लवकर तयार होईल या संदर्भात
पाठपुरावा करण्यात यावा असे सर्वानुमते ठरविण्यात आले

१९) विद्यार्थी व पालक यांच्या मागणीनुसार TY BSC या वर्गासाठी
विशेषस्तरावर (Special Subject) गणित (Mathematics)
हा विषय सुरू करण्यात यावा यावर सविस्तर चर्चा झाली आणि
चर्चेअंती विद्यापीठास T.Y. B.SC. Mathematics हा विषय
सुरू करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्याचे एकमताने ठरले

उपप्राचार्य प्रा. आर. एच. ठाकरे यांनी सभेच्या शेवटी
आभार प्रदर्शन केले आणि स्थानिक व्यवस्थापन समितीच्या
अध्यक्षा मा. सरचिटणीस श्रीमती निलिमाताई पवार यांच्या
परवानगीने सभा संपल्याचे जाहिर केले.

मंजूर

[signature]
6.8.2014